आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१५ फेब्रुवारी २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात सभापतींविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेण्यात येणार

- सेंट्रल बँक डिजीटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- महाशिवरात्रीचा सर्वत्र उत्साह

- महाराष्ट्रात दहशतवादविरोधी पथकाचे आज यवतमाळ आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापे

**आणि**

- टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत - पाकिस्तान लढत कोलंबोत रंगणार

**<><><><><>**

लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर ९ मार्चला पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेण्यात येईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला दिली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा  ९ मार्चला सुरु होईल, या टप्प्यात काही विधेयकं चर्चेला येतील, यात एक महत्त्वाचं विधेयक आहे असं त्यांनी सांगितलं. पहिल्याच दिवशी ९ मार्चला सभापतीं विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होईल आणि त्यानंतर मतदान होईल, असं रिजिजु म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज गुजरातमधे गांधीनगर इथं CBDC अर्थात केंद्रिय बँक डिजिटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं उद्घाटन केलं. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयातला भ्रष्टाचार यामुळे संपुष्टात येईल असा विश्वास यावेळी शहा यांनी व्यक्त केला. तसंच गरीबांना अन्न पोहोचणं सुलभ होईल, असं शहा म्हणाले.

**होल्ड बाईट शहा**

यापूर्वी नक्षलग्रस्त किंवा संघर्षग्रस्त भागात पाच किलो अन्नही गरिबापर्यंत पोहचत नसे, मात्र आज या प्रणालीचं डिजिटायजेशन झाल्यामुळे अन्न पोहोचणं सोपं झाल्याचं शहा यांनी सांगितलं.

<><><><><>

शहरांच्या विकासाकरता एक लाख कोटी रुपयांच्या यूसीएफ- अर्बन चॅलेंज फंडाला मंजुरी देण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. उच्च दर्जाच्या शहरी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी या फंडातून निधी उपलब्ध करून दिला जाईल, यामुळे शहरं देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका निभावतील असं प्रधानमंत्री म्हणाले. यूसीएफ ही गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्रालयाची योजना आहे, सर्वसमावेशक, काटक, विधायक आणि पर्यावरणाला अनुकूल शहरांची उभारणी करणं हे याचं उद्दिष्ट आहे. या योजनेमुळे पुढल्या पाच वर्षांत शहरी भागात चार लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल जर्मनीमध्ये भारत, जर्मनी, जपान आणि ब्राझील या G-4 देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची भेट घेतली. बैठकीदरम्यान, डॉ. जयशंकर यांनी सुधारित बहुपक्षीयतेवर चर्चा केली. म्युनिक सुरक्षा परिषद २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रथमच ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

<><><><><>

अहमदाबाद इथे गेल्या वर्षी झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघाताबाबत परदेशी माध्यमांनी केलेलं दाव्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी खंडन केलं आहे. अपघाताचा तपास अद्याप सुरू असल्याची माहिती मोहोळ यांनी सांगली इथे माध्यमांशी बोलताना दिली. या विमान अपघाताची चौकशी करणाऱ्या संस्थेने अपघातासाठी वैमानिकांना दोषी ठरवल्याचा दावा इटलीतल्या एका दैनिकाने केला होता. मात्र, अद्याप तपाससंस्थांनी तपास पूर्ण करून आपला अहवाल सादर केलेला नसून बाहेरच्या कुठल्याही संस्थांवर विश्वास ठेवू नये, असं मोहोळ म्हणाले. गेल्या वर्षी १२ जून रोजी

लंडनच्या दिशेने जाणारं एअर इंडियाचं विमान अहमदाबाद इथे उड्डाणानंतर लगेच कोसळलं होतं. त्यात विमानातल्या २४१ प्रवाशांसह २६० जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

बांगलादेशात नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी येत्या १७ फेब्रुवारी रोजी होणार असून या समारंभात सहभागी होण्यासाठी भारत, चीन, पाकिस्तानसह १३ देशांच्या प्रमुखांना निमंत्रित करण्यात आलं आहे. बांगलादेशात नुकत्याचा झालेल्या १३व्या राष्ट्रीय संसदीय निवडणुकांमध्ये बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या नेतृत्वातल्या युतीचा विजय झाला.

<><><><><>

बांगलादेशला भारताबरोबरचे संबंध नव्यानं प्रस्थापित करायचे असून, दोन्ही देशांनी परस्पर हितासाठी एकत्र येऊन काम करायला हवं, असं बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी चे अध्यक्ष तारिक रहमान यांचे सल्लागार हुमायून कबीर यांनी म्हटलं आहे. रहमान यांच्या बीएनपी नं गेल्या शुक्रवारी झालेल्या संसदीय निवडणुकीत मोठ्या बहुमतानं विजय मिळवला. त्यानंतर पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत कबीर बोलत होते. बांगलादेश मधल्या निवडणुकीत बीएनपीला मिळालेला स्पष्ट जनादेश लक्षात घेता, भारतानं इथलं बदललेलं राजकीय वास्तव ओळखायला हवं असं ते यावेळी म्हणाले.

बांगलादेशमध्ये २०२४ साली झालेल्या उठावानंतर अवामी लीग च्या अध्यक्ष शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर, बांगलादेशमधल्या अस्थिरतेला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांना भारतानं संरक्षण देऊ नये, अशी विनंती त्यांनी केली.

<><><><><>

महाशिवरात्रीचा उत्सव आज देशभरात भक्तीभावाने साजरा होत आहे. काशीविश्वनाथ, ओंकारेश्वर, घृष्णेश्वर, महांकाल, सोमनाथ, परळी वैजनाथ, त्र्यंबकेश्वर, रामेश्वर अशा प्रसिद्ध ज्योतिर्लिंगांसह ठिकठिकाणच्या शिवमंदिरांमधे आज पहाटेपासून भाविकांची गर्दी झाली आहे. दर्शनासाठी रांगा लागल्या आहेत. ठिकठिकाणी महादेव मंदिरांमधे शासकीय पूजा आणि अभिषेकही करण्यात येत आहे. चारधामपैकी बाबा केदरनाथ मंदिराचे दरवाजे येत्या २२ एप्रिलला उघडण्यात येणार असल्याची घोषणा आज महाशिवरात्रीच्या दिवशी करण्यात आली.

देशभरात गावोगावी महाशिवरात्रीनिमित्त जत्रा भरल्या आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, यांनी महाशिवरात्री निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही महाशिवरात्री निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

दहशतवादाशी संबंधित कारवायांप्रकरणी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं आज यवतमाळ आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापेमारी केली आणि काही संशयितांना ताब्यात घेतलं. यवतमाळमधल्या पुसद आणि उमरखेड इथल्या १४ ठिकाणी शोधमोहिमा सुरू असून आक्षेपार्ह कागदपत्रं, मोबाईल फोन आणि विद्युत उपकरणं जप्त केल्याची, तसंच सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. संशयितांची चौकशी सुरू असून आत्तापर्यंत कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. अहिल्यानगर जिल्ह्यात ७ ठिकाणी दहशतवादविरोधी पथकानं छापे टाकले आणि आक्षेपार्ह वस्तू जप्त केल्या. ही कारवाई अद्याप सुरू आहे.

<><><><><>

मुंबईत मुलुंड इथं मेट्रोचा पूल कोसळून झालेल्या अपघातप्रकरणी कार्यकारी अभियंत्याचं निलंबन करण्याचे आदेश उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. या अपघातात एक जण मृत्यूमुखी पडला, तर तीन जण जखमी झाले. जखमींवर उपचाराचा खर्च एम एम आर डी ए करणार असून या प्रकरणाची चौकशीही करण्यात येईल असं शिंदे यांनी सांगितलं. या अपघातासाठी आरएजेव्ही मिलन इन्फा या कंत्राटदार कंपनीला जबाबदार धरून, ५ कोटी रुपयांचा, तर डीबी इंडिनिअरिंग अँड कन्सल्टिंग, हिल इंटरनॅशनल, लुईज बर्गर कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना एक कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले असून, मृत व्यक्तीच्या कुटुंबाला ५ लाख रुपये मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत-पाकिस्तान लढत श्रीलंकेत कोलंबो इथं रंगणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी आपापले पहिले २ सामने

जिंकून प्रत्येकी ४ गुण मिळवले आहेत. आजच्या लढतीवर त्यांचं उपान्त्य फेरीतलं स्थान ठरेल.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर वेस्ट इंडीज विरुद्ध नेपाळ हा सामना सुरु असून नेपाळने विजयासाठी १३४ धावांचं आव्हान वेस्ट इंडीज समोर ठेवलं आहे. शेवटची बातमी मिळाली तेव्हा वेस्ट इंडीजच्या १० व्या षटकात १ बाद ७३ धावा झाल्या होत्या.

नाणेफेक जिंकून वेस्ट इंडीज संघाने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आणि नेपाळने ८ गडी बाद १३३ धावा केल्या.

अमेरिका - नामिबिया सामना दुपारी तीन वाजता चेन्नई इथं सुरु होईल.

**<><><><><>**

यंदाच्या फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेनं सीरियामधल्या इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेच्या तळांवर ३० पेक्षा जास्त हल्ले केल्याचं अमेरिकन लष्करानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये इस्लामिक स्टेटच्या हल्ल्यात अमेरिकेचा एक सैनिक आणि स्थानिक दुभाषा ठार झाला होता. त्याला प्रतिसाद म्हणून आपण हे हल्ले केल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. गेल्या दोन महिन्यांत अमेरिकेच्या हल्ल्यांमध्ये इस्लामिक स्टेटचे ५० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले असून, त्यांच्या १०० पेक्षा जास्त छावण्या उध्वस्त झाल्याचं यात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**